# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 20 November 2024

## Time: 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २० नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

राज्यात २८८ विधानसभा मतदार संघांसोबत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी सर्वत्र उत्साहात मतदान होत आहे. राज्यात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून; एक लाख ४२७ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. राज्यात नऊ वाजेपर्यंत सहा पूर्णांक ६१ टक्के मतदान झालं.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी मुंबईत मतदान केलं.

बारामती विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अजित पवार यांनी काटेवाडी इथल्या मतदान केंद्रावर मतदान केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सकाळी नऊ वाजेपर्यंत सात पूर्णांक पाच टक्के मतदान झालं. जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत सुरू आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी वेब कास्टिंगद्वारे जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांचं निरीक्षण केलं, तसंच सहकुटुंब मतदान केलं. सिल्लोडचे महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार, महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश पांडूरंग बनकर, औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलिल, खासदार संदीपान भुमरे, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात चार आदर्श मतदार केंद्र प्रशासनाच्या वतीने उभारण्यात आले आहेत. प्रतीक्षागृह, पाळणाघर, आरोग्य सुविधा मतदारांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

बीड जिल्ह्यात सहा पूर्णांक ८८ टक्के, हिंगोली – सहा पूर्णांक ४५ टक्के, जालना – सात पूर्णांक ५१ टक्के, लातूर सुमारे सहा सुमारे टक्के, धाराशिव – चार पूर्णांक ८५ टक्के, तर परभणी जिल्ह्यात सकाळी नऊ वाजेपर्यंत सहा पूर्णांक ५९ टक्के मतदान झालं.

नांदेड जिल्ह्यात २५ वर्षानंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी एकत्र मतदान होत आहे. जिल्ह्यात सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत विधानसभेसाठी पाच पूर्णांक ५२ टक्के, तर लोकसभा पोटनिवडणुकीत सहा पूर्णांक शून्य तीन टक्के मतदान झालं. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे यांनी मतदानाचा हक्क बजावला.

परभणी शहरात कडाक्याच्या थंडीतही मतदारांनी उत्साह दाखवत मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लावल्याचं चित्र दिसून येत आहे.

हिंगोली शहरात सकाळपासून मतदानाला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात मौजे हिवरा इथं विठ्ठल मुंडे या १०५ वर्षाच्या वृद्ध नागरीकाने मतदानाचा हक्क बजावला.

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास घाडगे पाटील, लातूर शहर मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमित देशमुख यांनी मतदान केलं.

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा शहरात विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रावरच्या मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे सुमारे अर्धा तास मतदान थांबलं होतं, मात्र बिघाड दुरुस्त झाल्यावर मतदान सुरळीत सुरू झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

लातूर जिल्ह्यात सर्वत्र शांततेत मतदान सुरू आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर शहरातल्या विविध मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेची पाहणी केली.

****

राज्यातल्या नागरीकांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. लोकशाहीच्या या उत्सवात सर्वांनी सहभाग घ्यावा, विशेषत: महिला आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

****

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देखील आज मतदान होत असून, या टप्प्यात १२ जिल्ह्यांमधल्या ३८ मतदारसंघांचा समावेश आहे.

****

ब्राझिलची राजधानी रिओ-दी-जानेरिओ इथं सुरू असलेल्या जी-20 परिषदेचा काल समारोप झाला. कालच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शाश्वत विकास आणि ऊर्जा संक्रमण या विषयावरील प्रथम सत्राला संबोधित केलं. शाश्वत विकासाच्या प्रयत्नांना प्राधान्यक्रम देत त्यांना पुढे नेण्याच्या ब्राझीलच्या निर्णयाचं त्यांनी स्वागत केलं. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी, शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी भारताने कोणती पावलं उचलली आहेत याची सविस्तर माहिती दिली. जी - 20 परिषदेसाठीचा ब्रझील दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गयानाची राजधानी जॉर्जटाउन इथं पोहचले.

****

पंचावन्नाव्वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात ईफ्फी आजपासून गोव्यात सुरू होत आहे. हा महोत्सव २८ नोव्हेंबरपर्यंत चालेल. या महोत्सवात ८१ देशांचे १८० चित्रपट दाखवले जाणार आहेत.

****

रेल्वे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी या महिन्याच्या शेवटी देशभरातल्या महत्वाच्या ३७० रेल्वेगाड्यांना सामान्य श्रेणीचे एक हजार नवीन डबे जोडण्यात येणार आहेत. भारतीय रेल्वे मंडळाच्या माहिती आणि प्रसिद्धी विभागाचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप कुमार यांनी काल नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींना ही माहिती दिली.

****